**महाराष्ट्र शासन**

**महाराष्ट्र कारागृह विभाग**

**नागपूर मध्यवर्ती कारागृह, वर्धा रोड, अजनी चौक, नागपूर-४४००२०**

## -मोहोरबंद निविदेव्दारे जाहिर लिलाव-

नागपूर मध्यवर्ती कारागृह, नागपूर-२० येथील शेती प्रक्षेत्रावरील तसेच कारागृह आतील व बाहेरील परिसरातील १४८ झाडापैकी ५८ नग चिंच झाडांवरील चिंच फळांचा जाहीर लिलाव प्रकरणी दि. **०८/०४/२०२६** ते दि.**१६/०४/२०२६** या कालावधीत सकाळी **११.००** ते **४.००** वाजेपर्यंत मोहोरबंद निविदा मागविण्यात येत आहेत. सदर निविदा दिनांक **१७/०४/२०२६** रोजी सकाळी **१२.००** वाजता अधीक्षक, नागपूर मध्यवर्ती कारागृह, नागपूर यांचे दालनात उघडण्यात येतील.

तरी इच्छुकांनी निविदा फॉर्म व लिलावाच्या अटी शर्ती संबधीत माहीतीसाठी तसेच चिंच फळांची पाहणी करणेसाठी अधीक्षक, मध्यवर्ती कारागृह, नागपूर शेती विभाग यांचे कार्यालयाशी सुटटीचे दिवस सोडून कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.

**(वैभव सु. आगे)**
अधीक्षक,
नागपूर मध्यवर्ती कारागृह
नागपूर

## मोहोरबंद निविदा उघडण्याचा तपशील

| | |
|---|---|
| मोहोरबंद दरपत्रक सादर करण्याचे ठिकाण- | नागपूर मध्यवर्ती कारागृहाचे मुख्यव्दारा समोरील दरपत्रक पेटीत सिलबंद टाकावेत. |
| मोहोरबंद दरपत्रक सादर करण्याचा दिनांक- | दि. ०८/०४/२०२६ वेळ- सकाळी ११.०० ते दि. १६/०४/२०२६ सायंकाळी १६.०० वाजेपर्यंत |
| चिंच झाडे पाहण्याचा दिनांक व वेळ- | दि. ०८/०४/२०२६ ते दि. दि. १६/०४/२०२६ या कालावधीत वेळ- १०.००ते १५.०० वाजेपर्यंत |
| मोहोरबंद दरपत्रक उघडण्याचा दिनांक- | दि.१७/०४/२०२६ वेळ-सकाळी १२.०० वाजता |

## अटी व शर्तीखालील प्रमाणे राहतील

१ नागपूर मध्यवर्ती कारागृह कार्यालयात चिंच फळे निविदा विक्रीचा फार्म दिनांक ०८/०४/२०२६ सकाळी १०.०० वा. पासून ते दिनांक १६/०४/२०२६ रोजी सायंकाळी ३.०० वाजेपर्यंत याकार्यालयीन वेळेत उपलब्ध राहील.

२ निविदा फॉर्मची किमंत रू. २००/- ना परतावा राहील.

३ दिनांक १६/०४/२०२६ पर्यंत सायंकाळी ०४.०० वाजेपर्यतच निविदा फार्म स्विकारण्यात येतील.

४ मोहरबंद निविदेसोबत अनामत रक्कम रु.३००/- रोखीने भरणा करावी लागेल व लिलाव मंजूर झालेल्या ठेकेदाराव्यतिरीक्त इतरांची अनामत रक्कम लिलाव समाप्तीनंतर परत करण्यात येईल.

५ मोहोरबंद दरपत्रकामध्ये कोणतीही खाडाखोड, गिरवागिरव अथवा व्हाईट इंक(व्हाईटनर)चा वापरकरता येणार नाही.

६ मोहोरबंद दरपत्रक कार्यालयीन वेळेत नागपूर मध्यवर्ती कारागृहाच्या मुख्यव्दारा समोरील दरपत्रक पेटीत सिलबंद टाकावे, पाकीटावर प्रति मा. अधीक्षक, नागपूर मध्यवर्ती कारागृह यांचे नावे तसेच वरील बाजुस **शेती विभाग (चिंच फळे लिलाव) दरपत्रक असे स्पष्ट नमुद करावे तसेच प्रेषक म्हणून आपले नाव, पत्ता व मोबाईल क्र. नमुद करावा.**

७ चिंच फळे काढणी व नेण्यासाठीची वाहतुक व्यवस्था स्वत: निविदाधारकास दिलेल्या कालावधीत करावी लागेल.

८ लिलावातील बोली रक्कम ही निविदमध्ये भरलेली सर्वात जास्त रक्कम व चिंच फळांचे ठरलेले मुल्य यापैकी जास्त असेल त्या रकमेपासून पुढे सुरू होईल व जो कंत्राटदार जास्तीत जास्त बोली लावेल त्यास चिंच फळे लिलाव मंजूर करण्यात येईल.

९ लिलावातील बोलीत ज्यांची बोली जास्त असेल त्यांना बोलीचे १० टक्के रक्कम (किमान)त्वरीत व उर्वरित रक्कम ७ दिवसाचे आत रोख स्वरुपात भरावी लागेल.

१० सदर लिलाव करावयाची चिंच फळे काढण्याची अंतीम मुदत दि. ३१.०५.२०२६ पर्यंत असून तदनंतर लिलाव धारकाचा चिंच फळावर हक्क राहणार नाही तसेच लिलाव केलेल्या चिंच फळाव्यतिरीक्त इतर कोणत्याही वस्तूवर लिलावधारकाचा हक्क राहणार नाही.

११ कारागृह विभागाची लिलाव समिती यांना लिलावात आलेले दर कोणतेही कारण न दर्शविता नाकारण्याचा अधिकार लिलाव समितीकडे राखुन ठेवण्यात आलेला आहे.

१२ दरपत्रकासोबत जोडलेल्या नमुन्यामध्ये निविदा धारकाने ओळखीचा पुरावा म्हणुन आधारकार्ड व पॅनकार्ड ची स्वसांक्षांकित छायांकित प्रत सोबत जोडणे आवश्यक आहे.

१३ निविदाकार निविदा उघडते वेळी जर हजर राहिले नाही तर त्यांचे गैरहजेरीत निविदा उघडण्यात येतील.

१४ लिलावाकरिता किमान तीन निविदा प्राप्त होणे आवश्यक आहे, किमान तीन निविदा प्राप्त न झाल्यास फेरनिविदा काढणे किंवा निविदा रद्द करणे याबाबत निर्णय घेण्याचे अधिकार अधीक्षक, नागपूर मध्यवर्ती कारागृह यांच्या अधिकारकक्षेत आहे.

१५ ठेकेदार राखणीसाठी रखवालदार ठेवणार असल्यास त्यास ओळखपत्र देणे आवश्यक आहे तसेच ठेकेदार किंवा त्याचे व्यक्तीकडून कारागृह बगिच्यातील वस्तू किंवा फळ झाडांचे नुकसान करू नये अन्यथा नुकसान भरपाई देण्याची सर्वस्वी जवाबदारी ठेकेदारावर राहील.

१६ वरिल सर्व अटी व शर्थीची पूर्तता न केल्यास आपले मोहोरबंद दरपत्रक रद्द/अपात्र समजण्यात येईल याची नोंद घेण्यात यावी.

( वैभव सु. आगे )
**अधीक्षक**
**नागपूर मध्यवर्ती कारागृह**